दैनिक

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

मुख्य संपादक : अजश भांगे

बीड/महाराष्ट्र | मंगळवार दि.४ मार्च २०२५ | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ | वर्ष २ रे | अंक-१२८ | पाने ४ | किंमत ४ रुपये

## आरोग्य विभागातील कोणत्याही कामांना स्थगिती नाही

**मुंबई**–तानाजी सावंत यांनी आरोग्य मंत्री असताना मंजूर केलेल्या आरोग्य विभागाच्या ३ हजार २०० कोटी रुपयांच्या कामांना स्थगिती देवेंद्र फडणवीसांनी स्थगिती दिल्याची चर्चा होती. मात्र, आता चर्चांवर तानाजी सावंत यांनी स्पष्टीकरण दिले आहे. राज्याच्या मंत्रिमंडळाने किंवा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी आरोग्य विभागाच्या कामांना कोणत्याही पद्धतीने स्थगिती दिलेली नाही, असे तानाजी सावंत यांनी म्हटले आहे. घोटाळा झाल्याचा आरोप झाला, पण सरकारच्या तिजोरीतून एक रुपयाही कुठे गेलेला नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.राज्याच्या विधिमंडळाचे अधिवेशनाला आजपासून सुरुवात झाली. शिंदे गटाचे आमदार तानाजी सावंत यांनी अशिवेशनाला हजेरी लावली. यावेळी त्यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. आरोग्य विभागाच्या कामांच्या स्थगितीबद्दल प्रश्न विचारला असता त्यांनी उपरोक्त स्पष्टीकरण दिले. तसेच जितेंद्र आव्हाड यांच्यावरही निशाणा साधला.गेल्या दोन दिवसांपासून कामांच्या स्थगितीबाबत जो विषय सुरु आहे, त्या विषयाची माहिती घेणे गरजेचे आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी मी चर्चा केली. अशा कोणत्याही गोष्टीला मंत्रिमंडळाने किंवा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्थगिती दिलेली नाही.

## 'लाडकी बहीण' योजनेचा फेब्रुवारीचा हप्ता मार्चमध्ये

# गत महिन्याचा हप्ता महिला दिनाच्या पूर्व संध्येला मिळणार-अदिती तटकरेंची माहिती

**मुंबई (वृत्तसंस्था)**

लाडक्या बहिणींना फेब्रुवारी महिन्याचा हप्ता हा महिला दिनाच्या पूर्वसंध्येला देण्यात येणार, अशी माहिती मंत्री अदिती तटकरे यांनी दिली आहे. तर महिला प्रतिनिधीसाठी विशेष सत्र होणार असल्याची माहिती आहे.अदिती तटकरे पुढे बोलताना म्हणाल्या की, लाडकी बहीण योजनेवर विरोधक आधीपासूनच टीका करत आले आहेत. आम्ही जवळपास अडीच कोटी महिलापर्यंत पोहचू शकलो आहोत, गेल्या महिन्यातदेखील २ कोटी ४० लक्ष महिलांना यांचा लाभ पोहचला आहे. फेब्रुवारी महिन्यातीलदेखील त्याच प्रमाणात लाभार्थी राहणार आहेत.

अदिती तटकरे म्हणाल्या की, लाडकी बहीण योजना ही विरोधकांच्या डोळ्यात खूपत असल्याने त्यांनी ह्या योजनेला विरोध केला आहे. आता महिलांचा महायुतीला मिळणारा प्रतिसाद पाहता त्यांना नैराश्य आले आहे. म्हणून ते खोट्या गोष्टी पसरवण्याचा प्रयत्न करत आहेत. पण महायुतीचे सरकार सक्षम आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार, एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील सरकार ही योजना अशीच सुरू ठेवणार आहे.अदिती तटकरे म्हणाल्या की, फेब्रुवारी महिन्याचा जो हप्ता आहे तो आपण महिला दिनाच्या पूर्वसंध्येला महिल्याच्या खात्यात जमा करणार आहोत. तर मार्च महिन्याचा हप्ता अधिवेशन झाल्यावर विभागाच्या वतीने निधीचे नियोजन करण्यात येईल तेव्हा देण्यात येईल.अदिती तटकरे म्हणाल्या की, लाडकी बहीण योजनेचा हप्ता २१०० रुपये करण्याचा योग्य निर्णय हा मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री घेतील. आम्ही योजनेचा निधी लाडक्या बहीणींच्या खात्यात कसा जाईल यासाठी प्रयत्न करणार आहोत. बचत गटाच्या माध्यमातून महिलांनी आर्थिक सक्षम व्हावे यासाठी आम्ही प्रयत्नशील राहणार आहोत.अदिती तटकरे म्हणाल्या की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल रायगडमध्ये असताना सांगितले की रायगड जिल्ह्याचे पालकमंत्रीपदासंदर्भात योग्य निर्णय होईल. आता मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री यांच्याकडे पालकत्व आहे. त्यामुळे रायगडचा विकास कुठेही खंडित होणार नाही.



## दिल्ली वर्ल्ड पब्लिक स्कूल मध्ये जागतिक विज्ञान दिनाचे औचित्य साधून भव्य विज्ञान प्रदर्शनीचे आयोजन





**परळी । प्रतिनीधी**

दरवर्षी प्रमाणे या ही वर्षी प्रशालेतील प्राचार्य, विद्यार्थी, पालक,शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांच्या उपस्थितीत विज्ञान दिवस व सी.व्हि. रमण यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आली.

सदर कार्यक्रमाची सुरुवात प्रतिमा पूजन व दीपप्रज्वलन करून करण्यात आली. यावेळी प्रशालेचे मुख्याध्यापक श्रीकांत पाटील सर व प्रमुख पाहुणे व परीक्षक म्हणून लाभलेले लक्ष्मीबाई महिला महाविद्यालयाचे प्रा. अशोक पवार सर आणि प्रा.सौ.विना भांगे मॅडम व कु. वेदांचे पाटील यांच्या हस्ते प्रतिमा पूजन तसेच उद्घाटन करण्यात आले.

यावेळी प्रशालेच्या विद्यार्थ्यांनी विविध विज्ञान प्रकल्पांचे सादरीकरण यामध्ये प्रत्यक्ष कार्य करणाऱ्या प्रतिकृती , चित्रफिती, चित्र इत्यादी प्रकल्पांचा समावेश होता. या सर्व प्रकल्पातून विद्यार्थ्यांनी आपल्या वैज्ञानिकतेची चुणूक दाखवत उत्तम प्रकारे प्रकल्पांचे स्पष्टीकरण ही केले. या प्रदर्शनीस प्रेक्षक म्हणून प्रमुख पाहुणे तसेच पालकांचे योगदान लाभले.यामध्ये इयत्ता पहिली ते आठवी पर्यंतच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. दरवर्षी विज्ञान प्रदर्शनी भरवण्यामागे विद्यार्थ्यांच्या अंगी वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवण्याचा तसेच विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळावा या उद्देशाने आयोजन करण्यात येते. याप्रसंगी सर्व शिक्षकवर्ग व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थिती होते.तसेच प्रशालेचे मुख्याध्यापकांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्रमुख पाहुण्यांनी आपले मनोगत व्यक्त करत विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

सदर प्रसंगी विवेकानंद युथ वेलफेअर सोसायटीच्या अध्यक्षा सौ.उषा किरण गित्ते मॅडम यांनी विज्ञान दिनाच्या सर्व विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.तसेच प्रशालेचे प्रेरणास्थान व मार्गदर्शक मा. श्री. किरण गित्ते साहेब (सचिव,नगरविकास, सार्वजनिक बांधकाम, उद्योग आरोग्य,पर्यटन विभाग त्रिपुरा सरकार) प्रशालेचे मुख्याध्यापक श्री.श्रीकांत पाटील यांनी सर्व विद्यार्थी शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांना विज्ञान दिनानिमित्तनिमित्त हार्दिक शुभेच्छा दिल्या आणि विद्यार्थ्यांना वैज्ञानिक संशोधनात प्रगती करण्यासाठी प्रोत्साहित केले. विज्ञान दिनाची सांगता विद्यार्थी संशोधकांनी अत्यंत उत्साहात व आनंदात केली.

## राज्यातून तुला उध्वस्त केल्या शिवाय स्वस्थ बसणार नाही!

### शिवसेना नेते रामदास कदम यांचें उध्दव ठाकरेंना जाहीर आव्हान



**मुंबई (वृत्तसंस्था)**

एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे नेते रामदास कदम यांनी पुन्हा एकदा ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्यावर सडकून टीका केली आहे. या महाराष्ट्रातून उद्धव ठाकरेंना उद्धवस्त केल्याशिवाय मी स्वस्थ बसणार नाही असं वक्तव्य रामदास कदम यांनी केलं. तर राज्यातून उद्धवस्त केल्याशिवाय रामदास कदम नाव सांगणार नाही, असं म्हणत रामदास कदम यांनी उद्धव ठाकरेंना थेट इशारा दिला आहे. हा इशारा देत असताना उद्धव ठाकरे यांनी योगेश कदम यांना संपवण्याचा प्रयत्न केला असल्याचा आरोपही रामदास कदम यांनी उद्धव ठाकरेंवर केला. दरम्यान, रामदास कदम यांनी उद्धव ठाकरेंवर केलेल्या आरोपांवर आणि टीकेवर ठाकरे गटाचे नेते संजय राऊत यांच्याकडून पलटवार करण्यात आला आहे. एक दिवस तुम्हाला पुन्हा मातोश्रीच्या दारात यावं लागेल, असा दावा संजय राऊत यांनी केलाय. 'उद्धव ठाकरेंना उद्धवस्त करण्याचं त्यांच्या आयुष्यातील जर ते ध्येय असेल तर करूद्या.तुमचं हे फडफडणं तात्पुरतं आहे. सत्ता आहे तोपर्यंत तुमचं फडफडणं आहे. पण एकदिवस तुम्हाला पुन्हा मातोश्रीच्या दारात यावं लागेल हे माझं भाकित नसून माझा दावा आहे. असं वक्तव्य संजय राऊत यांनी करत रामदास कदमांवर निशाणा साधलाय

## मस्साजोग प्रकरणातील फोटो प्रसारीत करु नयेत-नवनीत कावत पोलीस अधिक्षक बीड

**केज । प्रतिनिधी**



दिनांक ०३ मार्च २०२५ रोजी मस्साजोग येथील सरपंच स्व.संतोष देशमुख यांचे हत्या प्रकरणात गुन्हे अन्वेषन विभाग यांनी मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले आहे.काल दिनांक ३ मार्च २०२५ रोजी तपासाचा भाग असलेले काही फोटो टीव्ही चॅनेलवर तसेच समाज माध्यमांवर प्रसारित- व्हायरल झाले आहेत.सदरील फोटो हे मन विचलित करणारे आहेत.त्यामुळे व्हायरल फोटोंवरून समाज माध्यमांवर जनतेच्या प्रतिक्रीया उमटत आहेत.सदरील प्रकरण हेआता न्यायप्रविष्ट असून सदर फोटो हे न्यायालयीन प्रक्रियेचा भाग आहे.त्यामुळे जनतेने कायदा हातात घेऊ नये असे आवाहन पोलीस अधीक्षक श्री.नवनीत काँवत यांनी केले आहे.

# साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ विकास महामंडळातर्फे कर्जासाठी अर्ज करण्याचे आवाहन

**जालना । असलम कुरेशी**

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (मर्या) जालना जिल्हा कार्यालयास सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाकरीता थेट कर्ज योजना राबविली जात असून थेट कर्ज योजनेचे कर्ज प्रस्ताव जालना जिल्ह्यातील मातंग समाजातील इच्छुक अर्जदाराकडुन मागविण्यात येत आहे.

अर्जदाराचे वय १८ वर्ष पुर्ण असावे व ५० वर्षापेक्षा जास्त नसावे. शहरी व ग्रामीण अर्जदाराच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रु. ३ लाख पेक्षा जास्त नसावे तसेच अर्जदाराने या पुर्वी महामंडळाच्या कुठल्याही योजनेचा लाभ घेतलेला नसावा नियमाप्रमाणे आवश्यक त्या कागदपत्रांची पुर्तता करुन सदर योजनेत साधरणपणे सामाविष्ट लघु व्यवसाय उदा. शेळीपालन, फळभाजी विक्री, हॉटेल व्यवसाय, फिरते साडी सेंटर, झाडु टोपले, शिलाई मशिन, ब्युटीपार्लर, म्हसाला उद्योग, पापड उद्योग, फिरते कापड व्यवसाय, बेकरी, द्रोन पत्रवाळी इत्यादी व्यवसायासाठी कर्ज प्रस्ताव दोन प्रतीत खालील ठिकाणी स्वतः अर्जदाराने मुळ कागदपत्रासह उपस्थीत राहुन दाखल करावे त्रयस्त/मध्यस्थामार्फत कर्ज प्रकरणे स्विकारण्यात येणार नाहीत. तसेच या पुर्वी थेट कर्ज योजनेचे ऑनलाइन केलेले कर्ज अर्ज प्रस्ताव ग्राह्य झालेले आहे. कर्ज प्रकरणासोबत जोडावयाची कागदपत्रे जातीचा दाखला, उत्पन्नाचा दाखला, रेशनकार्डची झेरॉक्स प्रत, आधार कार्डची झेरॉक्स प्रत, पॅन कार्डची झेरॉक्स प्रत, तीन पासपोर्ट फोटो, व्यवसायाचे परपत्रक (कोटेशन), व्यवसाय ज्या टिकाणी करावयाचा आहे त्या ठिकाणची भाडे पावती, करारपत्रक किंवा मालकी हक्काचा पुरावा, (नमुना नं ८, लाईट बिल व टॅक्स पावती), ग्रामपंचायत/नगरपालीका/महा नगरपालीका यांचे प्रमाणपत्र किंवा शॉप क्ट परवाना, व्यवसायासंबधी तांत्रिक प्रमाणपत्र तसेच अनुभवाचा दाखला, शैक्षणिक दाखला, अनुदान किंवा कर्जाचा लाभ न घेतलेले प्रमाणपत्र, अर्जदाराचे सिबील क्रेडीट स्कोअर ५०० असावा, अर्जदाराने आधारकार्ड जोडलेल्या बँक खात्याचा तपशिल सादर करावा, प्रकरणासोबतची सर्व कागदपत्रे स्वताःच्या स्वाक्षरीने साक्षांकीत करावी. एका कुटुंबातील एकाच व्यक्तीस सदर योजनेचा लाभ घेता येईल. इत्यादी. वरील योजनेचे कर्ज प्रस्ताव महामंडळाच्या विहित नमुन्यातील झेरॉक्स हस्तालिखित, टंकलिखित केलेला कर्ज अर्ज देने व स्विकारने दि. ३ मार्च २०२५ ते दि. २० मार्च २०२५ पर्यंत कार्यालयीन वेळेत सुट्टीचे दिवस वगळून सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत महामंडळाचे जिल्हा कार्यालय साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळ (मर्या) जिल्हा कार्यालय डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, तळमजला जिल्हाधिकारी कार्यालया समोर जालना या ठिकाणी स्विकारले जातील. अशी माहिती जिल्हा व्यवस्थापक साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे विकास महामंडळ यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविली आहे.

## वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ॲड.निलेश हेलोंडे पाटील यांची शेतकरी आत्महत्या कुटूंबास भेट

**जालना । असलम कुरेशी**



अंबड तालूक्यातील वडीगोद्री येथील नैराश्यग्रस्त शेतकरी पृथ्वीराज बबन काळे (वय ४३) यांनी ७ ऑक्टोबर, २०२३ रोजी आत्महत्या केली होती. या शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबियांची वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ड निलेश हेलोंडे पाटील यांनी आज सांत्वनपर भेट घेतली. या पीडित परिवाराच्या समस्या जाणून घेत त्यांना शासनाच्या वतीने देण्यात येणारी सर्व मदत करण्याची ग्वाही दिली. शेतकऱ्यांनी आलेल्या परिस्थितीसमोर हार न मानता आपल्या एका चुकीच्या निर्णयामुळे परिवाराची होणारी आबाळ लक्षात घेऊन परिस्थितीशी दोन हात करण्यासाठी खंबीर उभे राहण्याची गरज आहे. शासन व प्रशासन शेतकरी बांधवाच्या पाठीशी सदैव ठाम असल्याचे ड निलेश हेलोंडे पाटील यांनी सांगितले. यावेळी तहसीलदार कार्यालयातील अधिकारी-कर्मचारी यांच्यासह काळे परिवारातील सदस्य व गावकरी उपस्थित होते.

## जाधव हॉस्पिटल धावडवाडी उद्घाटन सोहळा संपन्न

**जत । प्रतिनिधी**

धावडवाडी ता.जत येथे दिनांक ३ मार्च २०२५ रोजी सकाळी दहा वाजता जाधव हॉस्पिटल चा भव्य उद्घाटन सोहळा संपन्न करण्यात आला. यावेळी धावडवाडी गावचे सरपंच आप्पासो आवळे यांच्या हस्ते फोटो पूजन तसेच सर्व मान्यवरांच्या हस्ते हित कापून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आले.

यावेळी धावडवाडी चे सरपंच आप्पासो आवळे, हिवरे चे सरपंच अशोक चौगुले , गडदे दूध संकलन केंद्राचे मालक शंकर गडदे, राष्ट्रीय समाज पक्ष सांगली जिल्हा अध्यक्ष बंडू डोंबाळे सर, मारुती आण्णा देसाई,असलम कोकणे, दावल सोनीकर,हजरत सोनीकर, दीपक दाईगडे, डॉक्टर भंडे ,लाईन मेन अशोक कांबळे साहेब व सर्व क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.



## संपादकीय..

# अभिजात भाषा मराठीचा गौरव!

'मराठी' भाषा ही आपली जननी आहे. या भाषेला समृद्ध इतिहास व परंपरा लाभलेली आहे. याच भाषेतून आपण आपल्या भावना, विचार प्रभावीपणे व्यक्त करीत आहोत आणि म्हणूनच काळाच्या ओघात भाषेच्या स्वरूपात कधीही बदल न होणारी, अलौकिक सौंदर्य लाभलेली कुलीन, सुसंस्कृत, उच्च, सभ्य व चिरकाल टिकणारी भाषा म्हणून आपण अभिजात भाषेला म्हणजेच पर्यायाने 'मराठी' भाषेला मनापासून मानतो. मागील महिन्यात केंद्र सरकारने मराठी भाषेला 'अभिजात भाषा' हा दर्जा प्रदान केलाय, याचा मनस्वी आनंद आहे. पण मी मराठी भाषेची अभ्यासक असल्याने माझी आई सुंदर आहे, अभिजात आहे, असे मला मनापासून वाटत असल्याने मी लिहिलेली व माझे पती आतिश सोसे यांनी संपादित केलेली 'अभिजात मराठी' व 'माय मराठी' या शीर्षकांची पाठ्यपुस्तके सीबीएसई व आयसीएई शाळांमधून पूर्व प्राथमिक ते आठव्या इयत्तेपर्यंत मागील तीन वर्षांपासून महाराष्ट्रभर शिकविली जात आहेत, त्याचा शासनाद्वारे, अभ्यासकांद्वारे गौरव केला जातोय आणि आज आमच्या तीन दशकांहूनही अधिक मराठी भाषिक लेखन व कार्याला यानिमित्ताने सन्मानच लाभल्याने अत्यानंद झाला आहे, अशी भावना मनाला फार समाधान देत आहे.

आपले राज्य महाराष्ट्र. आपल्या राज्याची मातृभाषा, राजभाषा ही मराठी. भाषेला आपण आपली आई म्हणतो. त्या अर्थाने आपली 'मराठी भाषा' आता ३ ऑक्टोबर २०२४ पासून 'अभिजात भाषा' म्हणून गौरविली गेली आहे.अभिजात भाषा म्हणजे चिरकाल टिकणारी व सौंदर्यप्रधान असलेली सुसंस्कृत भाषा होय. असे म्हटले जाते की, इ. स. पू. २०७ मध्ये ब्राम्ही लिपी आणि मराठी भाषेतील शिलालेख सापडला. इ. स. पू. तीनशे वर्षांपूर्वी मराठी भाषा बोलली जात होती. मराठी भाषेत काळानुरूप बदल होत गेले. आद्यकाल, यादवकाल, बहामनीकाल, छत्रपती शिवाजी महाराजांचा काळ, इंग्रजांचा काळ आणि पेशवे काळ या दरम्यान मराठी भाषेत वृद्धी झाली.

सर्वप्रथम सातवाहन राजांनी मराठी भाषेचा वापर व्यवहार, प्रशासनात केल्याचा दाखला मिळतो. त्यानंतर यादवांच्या काळात मराठी संस्कृती व भाषा भरभराटीस आली. इ .स. ११८८ मध्ये आद्यकवी मुकुंदराज यांनी 'विवेकसिंधू' तर संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींनी इ. स. ११९० मध्ये 'ज्ञानेश्वरी' हा ग्रंथ लिहून मराठी भाषेला राजाश्रय मिळवून दिला. इ. स. १९६० मध्ये महाराष्ट्र राज्याची स्वतंत्रीत्या निर्मिती होऊन मराठी राजभाषा घोषित करण्यात आले. मुकुंदराज, संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत तुकाराम, संत एकनाथ, रामदास, श्रीधर, मुक्तेश्वर, मोरोपंत यांच्यासह अनेक कवींना मराठी भाषेचे आद्य कवी मानले जाते.आता ही भाषा जगभरात बाहात्तर देशांमध्ये व भारतातील छत्तीस राज्यात बोलली जाते. अधिकृत भाषांमध्ये मराठी भाषेला पंधरावा क्रमांक मिळाला. सुमारे अकरा कोटींहूनही अधिक लोक मराठी भाषा बोलतात. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यासाठी मागील अनेक वर्षांपासून प्रयत्न सुरू होते. पण त्यासाठी केंद्र सरकारचे काही निकष ठरलेले होते. जसे-भाषेचा नोंदवलेला इतिहास हा अतीव प्राचीन स्वरूपाचा म्हणजे १५०० ते २००० वर्षं जुना हवा, प्राचीन साहित्य हवे, जे त्या भाषिकांना मौल्यवान वारसा वाटते, दुसऱ्या भाषा समूहाकडून उसनी न घेतलेली अस्सल साहित्यिक परंपरा हवी, 'अभिजात' भाषा ही आजच्या भाषेपेक्षा निराळी हवी, असे प्रारूप ठरलेले असल्याने त्यानुसार मराठी भाषा ही अभिजातच आहे, यासाठी महाराष्ट्र राज्य शासनाच्या वतीने रंगनाथ पठारे यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमून एक अभ्यासपूर्ण अहवाल भारतीय केंद्र सरकारकडे सादर केला होता. प्रारंभी जेव्हा ही भाषा बोलली गेली, तेव्हा महारठ्ठी-महरठ्ठी-मऱ्हाटी-मराठी असा मराठीचा उच्चार बदलत गेला, असं या अहवालात म्हटलं आहे. महाराष्ट्रीय भाषा ही महाराष्ट्र हा प्रदेश अस्तित्वात येण्याच्या फार पूर्वीपासून प्रचलित होती आणि मराठीचं वय किमान अडीच हजार वर्षं जुनं असल्याचे पुरावे असल्याचेही या अहवालात म्हटलं आहे.त्यानुसार ३ ऑक्टोबर २०२४ रोजी केंद्र सरकारने मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा जाहीर करून 'मराठी भाषेला' गौरव मिळवून दिला. भारत सरकारने आतापर्यंत तमिळ, संस्कृत, तेलुगू, कन्नड, मल्याळम, मराठी, बंगाली, पाली, प्राकृत, उडिया आणि आसामी अशा अकरा भाषांना हा अभिजात भाषेचा दर्जा दिला आहे. मराठी भाषेला अभिजात दर्जा दिल्यामुळे आता या भाषांसाठी काही संस्था नव्याने उभारल्या जातील. तसेच या भाषांमधल्या प्रकल्पांना पाठबळ देण्यासाठी आर्थिक तरतूदही केली जाईल. मराठी भाषेसाठी दरवर्षी कोट्यवधी रुपये भरीव अनुदान स्वरूपात दिले जाईल. त्यामुळे मराठीच्या बोलींचा अभ्यास, संशोधन, साहित्यसंग्रह करणे, भारतातील सर्व चारशे पन्नास विद्यापीठांमध्ये मराठी शिकवण्याची सोय करणे, प्राचीन ग्रंथ अनुवादित करणे, महाराष्ट्रातील सर्व बारा हजार ग्रंथालयांना सशक्त करणे, मराठीच्या उत्कर्षासाठी काम करणाऱ्या संस्था, व्यक्ती, विद्यार्थी अशा साऱ्यांना भरीव मदत करणे अगदी सुलभ होईल. त्या अर्थाने मराठी भाषेला लाभलेला हा अभिजात भाषेचा अलंकार निश्चितच गौरवणीय असाच आहे.दि. २७ फेब्रुवारी हा 'मराठी राजभाषा गौरव दिन' आहे. कविवर्य कुसुमाग्रज एक श्रेष्ठ आधुनिक कवी, कथाकार, समीक्षक, कादंबरीकार व नाटककार म्हणून कुसुमाग्रज प्रसिद्ध आहेत. त्यांचे पूर्ण नाव विष्णू वामन शिरवाडकर हे असून त्यांनी कुसुमाग्रज या टोपण नावाने लेखन केले आहे. त्यांची जन्मतारीख २७ फेब्रुवारी १९१२ ही असून त्यांचे जन्मस्थळ पुणे आहे. त्यांचा मृत्यू १० मार्च १९९९ रोजी झाला.जीवनलहरी, विशाखा, किनारा, कौंतेय, नटसम्राट ही त्यांची वाचकप्रिय पुस्तके आहेत.महाराष्ट्राचेच नव्हे तर जगभरातील मराठी रसिक आणि वाचकांचे अत्यंत आवडते लेखक, कवी म्हणून कुसुमाग्रज ऊर्फ वि. वा. शिरवाडकर यांचे नाव अतिशय आदराने घेतले जाते. त्यांचे साहित्य, सांस्कृतिक क्षेत्रातील मौलिक योगदान, 'मराठी भाषा' ही ज्ञानभाषा व्हावी, यासाठी त्यांनी घेतलेले अविरत परिश्रम, 'ज्ञानपीठ' या सर्वोच्च पुरस्काराने त्यांचा झालेला सन्मान इत्यादी या सर्व गोष्टींचा बहुमान 'माय मराठी' भाषेचा गौरव आणि कुसुमाग्रजांच्या स्मृतींना विनम्र अभिवादन म्हणून महाराष्ट्र शासनाने दि. २१ जानेवारी २०१३ रोजी शासन निर्णय काढून दि. २७ फेब्रुवारी (कविवर्य कुसुमाग्रज) यांचा जन्मदिवस हा 'मराठी भाषा गौरव दिन' म्हणून साजरा करण्याचा अध्यादेश काढला. त्या दिवसापासून संपूर्ण महाराष्ट्रात हा दिवस अतिशय उत्साहात व आनंदात साजरा करतात. निश्चितच या वर्षातला हा 'मराठी भाषा गौरव दिन' 'अभिजात भाषे'चा दर्जा मिळाल्याने संस्मरणीय राहील, ही भावना मनाला आनंद देणारी आहे.



केज तालुक्यातील उंदरी येथे अखंड हरिनाम सप्ताह विठ्ठल रुक्मिणी प्रतिष्ठान व कलशारोहन सोहळा व शिवपुराण कथा ह भ प बाळकृष्ण महाराज गडकर यांच्या किर्तन महोत्सवावेळी स्वागत करून शुभेच्छा देताना छावा जिल्हाध्यक्ष शिवाजी ठोंबरे

# स्कूल बस नियमावली कागदावर नको

शालेय विद्यार्थ्यांना शाळेत ने-आण करणाऱ्या खासगी स्कूल बससाठी येत्या नवीन शैक्षणिक वर्षापासून नवी नियमावली निश्चित करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. त्यासाठी निवृत्त परिवहन अधिकारी जितेंद्र पाटील यांच्या अध्यक्षतेखाली एक सदस्य समिती नेमली आहे. पुढील एका महिन्याच्या कालावधीत ही समिती आपला अहवाल परिवहन खात्याला सादर करणार आहे. अहवाल प्राप्त झाल्यावर जी नियमावली तयार होईल, त्याची अंमलबजावणी फक्त कागदावर राहायला नको आहे, अशी भावना मात्र पालकवर्गाची झाली आहे. या आधी राज्य सरकारच्या वतीने २०११ साली स्कूल बस नियमावली जारी केली होती. तरीही पुन्हा नियमावली काढण्याची वेळ का आली आहे. याचा अर्थ 'दया, कुछ तो गडबड है' असे म्हणण्याची वेळ आली आहे.

राज्यातील विविध शाळा आणि खासगी बस ऑपरेटरद्वारे चालवल्या जाणाऱ्या स्कूल बसेसच्या कार्यपद्धतीबाबत पालकांचा जोरदार आक्षेप आहे. विद्यार्थ्यांना शाळेत नेण्यासाठी खासगी संस्थांमार्फत हजारो स्कूल बसेस चालवण्यात येतात. या स्कूलबसच्या माध्यमातून अनेक संस्थांचालक पालकांची आर्थिक लुबाडणूक करत असल्याच्या तक्रारीही मागील काही वर्षांत परिवहन विभागाला प्राप्त झाल्या आहेत. या तक्रारींची दखल घेत परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी परिवहन विभागाच्या अधिकाऱ्यांसमवेत बैठक घेत, येत्या शैक्षणिक वर्षापासून खासगी स्कूल बसेससाठी नवी नियमावली निश्चित करण्यासाठी समिती नेमण्याचा निर्णय घेतला आहे, तो निश्चितच स्वागतार्ह आहे. तसेच या संदर्भात विद्यार्थी वाहतूक करणाऱ्या रिक्षाचालकांची मनमानी रोखण्यासाठी मदान समितीने सन २०११ मध्ये ज्या उपायोजना सुचवल्या होत्या, त्या विचारात घेऊन सर्वंकष अहवालाच्या आधारे स्कूल बसेससाठी नियमावली निश्चित केली जावी, याकडे




परिवहन मंत्र्यांनी लक्ष वेधले आहे.

शालेय शुल्क व स्कूल बस शुल्क एकाच वेळी पालकांकडून आकारले जात असल्यामुळे पालकांवर आर्थिक बोजा पडतो. त्यामुळे ही समिती २०११ साली विद्यार्थी वाहतूक करणाऱ्या वाहनांची मनमानी रोखण्यासाठी मदान समितीने ज्या उपाययोजना सुचवल्या होत्या, त्याही विचारात घेतल्या जाणार आहेत. विद्यार्थ्यांची सुरक्षितता लक्षात घेता प्रत्येक बसमध्ये आपत्कालीन परिस्थितीत त्वरित मदतीसाठी पॅनिक बटन, आग लागल्यास त्वरित नियंत्रणासाठी आग प्रतिबंधक स्पिंकलर, जीपीएस यंत्रणा, सीसीटीव्ही कॅमेरा असणे आवश्यक असणार आहेत. तसेच ज्या संस्था अथवा स्कूल बस चालवणारे चालक पालकांकडून विद्यार्थी वाहतुकीचे शुल्क आकारतात, त्यांच्याकडे बसेसमधील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे एकात्मक नियंत्रण ठेवण्याचा विचार केला जात आहे, ही सुद्धा चांगली बाब आहे. जेणेकरून बसमध्ये विद्यार्थ्यांच्या बाबतीत कोणतीही घटना घडली तरी, त्यावर उपाययोजना करणे त्वरित सोपे जाईल.

अडीच वर्षांपूर्वीची एक घटना डोळ्यांसमोर येते. सांताक्रूज येथील पोद्दार स्कूलची बस विद्यार्थ्यांना घेऊन चार तास मुंबईच्या अन्य रस्त्यांवरून फिरत होती. त्यामुळे ही स्कूल बस नक्की कुठे गेली याचा पत्ता न लागल्याने, पालक चिंताग्रस्त झाले होते. सुदैवाने त्यावेळी कोणतेही दुर्घटना घडली नव्हता. देव पाण्यात ठेवून आपल्या मुलांची प्रतीक्षा करणाऱ्या पालकांचा जीव त्यानंतर भांड्यात पडला. मुले सुखरूप घरी परतली. त्यामुळे, स्कूल बस आणि मुख्याध्यापक, पालक यांचा जीपीएसच्या माध्यमातून संपर्क व्हायला हवा, हा मुद्दा त्यावेळी प्रकर्षात पुढे आला. आता नव्या स्कूल बस नियमावलीत बसचे थेट लोकेशन पाहण्यासाठी जीपीएस यंत्रणेवर अधिक भर देण्याची गरज आहे. तसेच, विद्यार्थ्यांची सुरक्षितता लक्षात घेऊन, प्रत्येक बसमध्ये पॅनिक बटन, आग प्रतिबंधक स्प्रिंकलर, सीसीटीव्ही कॅमेरा असणे आवश्यक आहे. तसेच, बस चालवणारे चालक किंवा संस्थाचालक, जे पालकांकडून वाहतुकीचे शुल्क आकारतात, विद्यार्थी आणि बस स्टाफच्या हालचालींवर नजर ठेवण्यासाठी त्यांच्याकडे बसमधील सीसीटीव्ही कॅमेऱ्याचे नियंत्रण असणे आवश्यक आहे. मुलींच्या स्कूल बसमध्ये महिला अटेंडंट सक्तीने असावे, याचा नव्या नियमावलीत समावेश असावा.

पालकांना विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी खर्च करावा लागतो. त्यात अप्रत्यक्ष लुटमार होऊ नये याची काळजी सरकारने घ्यायला हवी. एकूण कालावधीपैकी १० महिने या स्कूल बसेस विद्यार्थी वाहतूक करतात; परंतु प्रत्यक्षात पूर्ण वर्षाचे शुल्क एकाच वेळी संबंधितांकडून आकारतात. ते यापुढे थांबायला हवे. तसेच शालेय शुल्क व शाळा बस शुल्क एकाच वेळी पालकांकडून आकारले जात असल्यामुळे त्याचा प्रचंड मोठा आर्थिक बोजा पालकांवर पडतो. जे अत्यंत अन्यायकारक आहे. त्याऐवजी संबंधित स्कूल बसचालकांनी केवळ दहा महिन्यांसाठीचे विद्यार्थी वाहतुकीचे शुल्क एकाच वेळी न घेता दर महिन्याला स्वीकारण्याची तरतूद असावी, असा पालकांचा आग्रह आहे.

ज्या शाळा किंवा बस ऑपरेटर पालकांकडून वाहतूक शुल्क आकारतात, त्यांच्यासाठी नव्या नियमावलीनुसार प्रणाली बंधनकारक असणार आहे. या प्रणालीद्वारे बसच्या हालचाली आणि आतील घडामोडींवर सतत देखरेख ठेवली जाईल. स्कूल बस ऑपरेशन्समध्ये अधिक जबाबदारी आणणे. या सुरक्षा नियमांचे पालन न करणाऱ्या स्कूल बसेसवर कठोर कारवाई केली जाणार आहे. नियमांचे उल्लंघन झाल्यास संबंधित बस ऑपरेटरचा परवाना रद्द केला जायला हवा. पालकांच्या तक्रारींना योग्य उत्तर देत सुरक्षा उपायांची काटेकोर अंमलबजावणी करण्याला प्राधान्य द्यायला हवे. विद्यार्थ्यांची सुरक्षितता ही शाळा व्यवस्थापन, बस ऑपरेटर आणि शासनाची सामूहिक जबाबदारी आहे. या नवीन नियमांमुळे स्कूल बसेसच्या व्यवस्थापनात सुधारणा होईल आणि शालेय विद्यार्थ्यांचा प्रवास अधिक सुरक्षित व नियोजनबद्ध होईल, अशी सकारात्मक अपेक्षा करायला हरकत नाही. याची काळजी संबंधित परिवहन विभागाने नक्कीच घ्यायला हवी.

# या सर्वांची जबाबदारी अखेर घेणार कोण?

असं म्हणतात की, एखादी गोष्ट घडण्यासाठी काहीतरी निमित्त लागते. तसेच सध्या काहीतरी घडत आहे. गेल्या आठवड्यात सर्वाधिक चर्चेत राहिलेली गोष्ट म्हणजे आणि पुण्यातील बलात्काराची घटना. या घटनेने सध्या पुणेच हादरलेले नसून, तर देशच हादरलेला आहे. बलात्कार म्हटले, तर ही काही नवीन गोष्ट नाही रोज वर्तमानपत्रात कानाकोपरा नजर टाकली तरी त्यात असंख्य बलात्काराच्या घटना दिसतील. मात्र त्यातल्या काही घटना चर्चेला येतात. स्वारगेटमधील बलात्कार हासुद्धा हा याच चर्चेतील वर्गातला. भर गर्दीत, वर्दळीच्या ठिकाणी असलेल्या व एका कोपऱ्यात एकांतात झालेला हा बलात्कार. या बद्दल सर्वांच्याच मनात चीड उत्पन्न झाली नसती तर नवल. त्यामुळे पुण्याचाच नव्हे तर महाराष्ट्राच्याच प्रतिमेला एक डाग निर्माण झाला मात्र वर म्हंटल्याप्रमाणे कोणती घटना घडण्यासाठी कोणते तरी निमित्त लागते. बलात्कार झाला ही दुर्दैवाची गोष्ट आहेच; परंतु त्यानिमित्ताने आपल्या समाज मनाची एसटी प्रशासनाची पोलिसांची सर्वांची झाडाझडती घेण्याची वेळ आली हे नसे का थोडके, त्यामुळे या बलात्कार प्रकरणाचा निकाल लागेल तो लागेलच मात्र त्यानिमित्ताने एसटी प्रशासन पोलीस सर्वांनाच आत्मपरीक्षण करावे लागेल हे नक्की.स्वारगेट येथील बस स्थानक येथे पहाटेच्या सुमारास फलटणकडे जाणाऱ्या मुलीवर बस स्थानक परिसरात उभ्या असणाऱ्या जुन्या शिवशाही बसमध्ये एकाने बलात्कार केला ही गोष्ट ज्या वेळेस उजेडात आली तेव्हा साधारण आठ वाजले होते. स्वारगेटसारखे वर्दळीचे बस स्थानक महाराष्ट्रात दुसरे कोणते नसेल. पुण्यातील स्वारगेट येथूनच सातारा, कोल्हापूर, कोकण, मुंबई, सोलापूर, मराठवाडा, तसेच फलटण, पंढरपूर सारख्या ठिकाणांसाठी व तिथून येणाऱ्या जाणाऱ्या बस गाड्या अक्षरशः २४ तास सुटत असतात अशात अशा वेळेस बलात्कार घटना होणे म्हणजे अशक्यच अशी गोष्ट होती असा तर्क लावला गेला. मात्र यात स्वारगेट परिसरात बस स्थानकात एका कोपऱ्यात झालेला जुन्या बसचा भंगार खाना तसेच सुरक्षिततेत चाललेली हयगय पाहता एसटी महामंडळाच्या कामांची झाडा -झडती घेणे क्रमप्राप्त झाले. ही घटना घडली तेव्हा कशी घडली तसेच हा स्वखुशीचा मामला होता की, केलेली जोर जबरदस्ती होती याचा कायद्यानुसार निकाल लागेलच मात्र त्या आनुषंगाने एसटी महामंडळाच्या दुर्लक्षित केलेल्या कामांचे धांधोळा ही आवश्यक ठरतो.मुंबई पुरता विचार केला तर मुंबई शहरासाठी एसटीचे तीन मोठे बस आगार आहेत. मुंबई सेंट्रल आगार. परळ आगार व कुर्ला नेहरू नगर आगार, तर दादर पुलाखाली एक छोटी जागा बस सुटण्यासाठी दिलेली आहे. पश्चिम उपनगरात बोरिवली येथे एसटीचे मोठे बस स्थानक आहे मात्र त्याला आगाराचा दर्जा नाही. त्यामुळे बोरिवली नॅन्सी वसाहत



येथील बस स्थानक व स्टेशनजवळील सुकुरवाडी बस स्थानक हीच काय ती एसटीचे स्थानके मात्र यांची तरी काय अवस्था आहे? वास्तविक पाहता एसटीची बस स्थानके ही वेगळा संशोधनाचा व अभ्यासाचा विषय आहेत, मात्र आता स्वारगेट घटनेमधून यावर सर्वत्र जोरदार चर्चा होईल थोडे दिवस त्याचे पालन केले जाईल मात्र नंतर पूर्वीसारखीच अवस्था होईल. मुंबई सेंट्रल येथील बसस्थानकाची तीच अवस्था त्यात असंख्य जाणारे मार्ग. त्यात चोर वाटा फार, कोण कोणता अगंतुक येतो याचा कोणालाही पत्ता नाही. पूर्वी मुंबई सेंट्रल बस स्थानकात बाहेरील कोणत्याही प्रवेश करणाऱ्या व्यक्तीस एक रुपया दर आकारला जात असे मात्र कालांतराने तोही बंद करण्यात आला. परळची अवस्था ही तीच तर कुर्ला नेहरूनगर बस स्थानकाचे, तर विचारायलाच नको कुर्ला नेहरूनगर बस आगार आहे की, आरटीओचा जुन्या व पकडून आणलेल्या गाड्या एकीकडचा भंगार गोळा करून त्याचे डोंगरच्या डोंगर थर तेथील आगारात तयार केले गेले आहेत त्यात असंख्य बेकायदेशीर कृत्य करण्याचे कुर्ला तर आत्ताच जणू बनलेला आहे. मध्यंतरी तेथे आरटीओचे केंद्र तयार होणार होते मात्र तेही रेंगाळले त्यामुळे पुन्हा ही जागा ओसाड बनू लागली असून आजूबाजूच्या झोपडपट्ट्यातील वाईट प्रवृत्ती आगाराच्या भिंत तोडून बोगदे तयार करतात आणि नवनव्या वाटा निर्माण केल्या जातात. येथील सुरक्षारक्षकांकडे त्यांना पळवले जाते मात्र त्याच्यावरही काही मर्यादा पडतात. काही समाजसेवी संस्था तसेच एसटी प्रेमी संस्था एसटी लवर्स ग्रुप असे महाराष्ट्रातील काही मंडळी वारंवार एसटीकडे सुरक्षेबाबत तक्रार करीत असतात त्यात मुंबईतील तसेच राज्य राज्यातील बस स्थानकांवर तेथील त्रुटी निदर्शनास आणून देत असतात स्वारगेट बस स्थानकातील बंद पडलेल्या बसेस गैरप्रवृत्तींचा अड्डा बनत चाललेल्या आहेत याकडे त्यांनी लक्ष वेधले होते मात्र नेहमीप्रमाणे एसटी महामंडळ आणि संबंधितांनी त्याकडे दुर्लक्ष केले त्याचीच परिणीती म्हणून त्या दिवशीची ही घटना समोर आली आणि नाव मात्र एसटी महामंडळाचे जनमानसात डागाळले. मुळात बस स्थानक हे बस स्थानकच असले पाहिजे त्यात स्क्रॅप व वस्तीच्या व इतर ठिकाणांवरून येणाऱ्या गाड्या नको तसेच एसटी बस स्थानकातील बस गाड्यांचे पार्किंग नको याकडे असंख्य वेळा लक्ष वेधण्यात आले होते. बस गाड्या ह्या आगारातच उभ्या केल्या पाहिजेत बस स्थानकात नको मात्र आज इतर ठिकाणावरून आलेल्या बस गाड्या या सर्व बस स्थानकात उभ्या केल्या जातात. तसेच या बस गाड्यांना कोणतीही लॉक सिस्टीम नसल्याने यामध्ये गैरप्रकार चालतात. तसेच प्रत्येक बस स्थानकात बाजारात चांगल्या प्रतीचे उच्च क्षमतेची दिवे लावावे ज्यामुळे संपूर्ण ठिकाणी सूर्यप्रकाश चांगला पडून गैरकृत्य होणार नाही याकडेही लक्ष वेधण्यात आले होते, मात्र त्याकडे महामंडळाने दुर्लक्ष केले. अंधारातच असे गैर प्रकार घडत असतात त्यात पोलिसांची गाडी आली का थातूरमातूर कारवाई होते मात्र पुन्हा परिस्थिती जैसे थे होते. त्यामुळे महिलांना या अंधारामुळे असंख्य प्रकारचा त्रास सहन करावा लागतो व असुरक्षितता निर्माण होते.एसटी बस स्थानकात फिरणारे गर्दुल्ले भिकारी तृतीयपंथीयांचा मोठा संशोधनाचा विषय आहे काही गर्दुल्ले भिकाऱ्यांचा वावर हा बस स्थानकात कायमचा असतो त्यात ठाणे खोपट ठाणे सीबीएस तर ठाणे रेल्वे स्थानकातील स्थानक तर परिसरात विचारायलाच नको अशी परिस्थिती आहे. वास्तविक पाहता बस स्थानकात व परिसरात फक्त बस गाड्यांना एन्ट्री असते मात्र सर्रास बस स्थानकातच रिक्षा व इतर खासगी गाड्या पार केलेल्या सर्वत्र आढळून येतात. बस स्थानकातील मुताऱ्यांची तर विचारता सोय नाही आधीच अस्वच्छ असलेल्या या मुताऱ्यात चांगल्या सुसंस्कृत माणसाला त्या ठिकाणी जाणे हे अवघडल्यासारखे वाटू शकते कारण तिथे असलेले समलैंगिक, विकृत प्रकारच्या व्यक्ती त्यांच्या नजरा नको आणणारा हा अनुभव असतो. या एसटी बस स्थानकत परिसरात सर्वांचा संचार असल्याने पाकीटमारी बस प्रवाशांचे सामान्यांच्या चोऱ्या या तर नित्य नियमितपणे सुरू असतात. कल्याण बस स्थानक हे त्याचे चांगले उदाहरण ठरते. महाराष्ट्र राज्यातील प्रत्येक बस तालुक्यात खासगी एजंटचा सुळसुळाट पाहायला मिळतो अक्षरशः एजंट प्रवाशांना पकडून पकडून घेऊन जीप, रिक्षा, टॅक्सी, लक्झरी यात बसवत असतात हे कोणाच्या आर्थिक देवाण-घेवाणतून घडत असते याचाही सर्व निकाल लागण्याची आज गरज आहे स्वारगेट येथील ती महिला बस स्थानकात बसली असताना आपण बस वाहक असल्याचे सांगत त्या महिलेला त्या बसमध्ये जबरदस्तीने देण्यात आले आज या दलालांवर नियंत्रण आणणार कोण. बस स्थानकातील सीसीटीव्ही कॅमेरे हे सुद्धा सर्वत्र असले तरी बंद पडलेले असतात. तिथे घटना जेव्हा घडते तेव्हा काहीच हाती लागत नाही आणि आता तर म्हणे प्रत्येक नवीन प्रत्येक बस गाडीत सीसीटीव्ही लावण्यात येत आहे जिथे बस गाडीचा हॉर्न व हेड लाईट लावण्यासाठी महामंडळ दुर्लक्ष करत असते ती सीसीटीव्ही कॅमेऱ्याची निगराणी काय ठेवणार. आपल्या बसमधील हरकतींचे पुरावे नको म्हणून बसचालक वाहकच बसमधील सीसीटीव्ही कॅमेरे काढून टाकल्याची उदाहरणे यापूर्वी घडलेली आहेत याचा अर्थ जखम एकीकडे आणि मलमपट्टी दुसरीकडे असाच सर्रास प्रकार असल्याचे दिसत आहे सध्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक हे चांगले कार्यक्षम दिसत आहे मात्र त्यांनी सुद्धा सध्या फक्त मोक्याच्या भूखंडांकडे जागांकडे लक्ष न देता इतर एसटीतील सर्व पर्यायाचा अभ्यास करून या सुरक्षिततेकडे लक्ष दिले पाहिजे!

# जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थी हे रत्नांची खाण-काळम पाटील साहेब

## बेलगुडवाडी जि.प.प्रा.शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न

**गेवराई । प्रतिनिधी**

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या विविध कलागुणांना प्रोत्साहन देणे हे त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. विद्यार्थ्यांना शालेय जीवनात केवळ शैक्षणिक ज्ञानच नव्हे, तर कलात्मक, सांस्कृतिक, क्रीडात्मक सृजनशील क्षेत्रांतही प्रोत्साहित करणे आवश्यक आहे. यामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढतो, व्यक्तिमत्त्व घडते म्हणूनच आमच्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत शिकणारे विद्यार्थी हे रत्नांची खान असून यांच्यामध्ये विविध कला गुण असतात असे प्रतिपादन जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी प्रवीण काळम पाटील यांनी केले.





दिनांक २७ फेब्रुवारी रोजी बेलगुडवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रम प्रसंगी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर सरपंच सौ लताबाई राधाकिसन जाधव, गेवराई तालुका शिक्षक पतसंस्थेचे चेअरमन विष्णु खेत्रे, मा. चेअरमन तात्यासाहेब मेघारे, आण्णासाहेब लोणकर, अर्जुनराव बारगजे, रोहितळ केंद्र प्रमुख रामराव पवार सर, सुदाम राठोड सर केंद्रीय मुख्याध्यापक रोहितळ, संचालक अर्जून जाधव यांच्यासह तालुक्यातील विविध शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षक संघटना व त्यांचे प्रतिनिधी यांच्यासह आदींची प्रमुख उपस्थिती होती. दरम्यान सर्व मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात अली. यानंतर या वार्षिक स्नेहसंमेलनामध्ये विद्यार्थ्यांनी देवा श्री गणेशा, उदे ग अंबे उदे मुळीच नव्हते रे कान्हा, चाकर शिवबाचे मैने पायल है छनकाई ,मदन मंजिरी ,नऊवारी साडी ,आम्ही शिवकन्या ,आपलीच हवा, हम काले हो तो क्या हुआ ,हुंडा नको मामा पोरगी द्या मला ,मल्हारी मल्हारी अशा गीतावर नृत्य सादर करत उपस्थितांची मने जिंकली.

याप्रसंगी काळम पाटील यांच्यासह गेवराई तालुका शिक्षक पतसंस्थेचे चेअरमन खेत्रे सर चेअरमन, माजी चेअरमन मेघार सर, बापूसाहेब तारुकर सर यांच्यासह आदींनी आपले मनोगत व्यक्त करत सर्व शिक्षक, विद्यार्थी व ग्रामस्थांचे तोंडभरून कौतुक केले.

या कार्यक्रमाला कुडके सर, सुळे सर, देशमुख सर, नवले सर, देशपांडे सर,श्रसाट सर, पंडित सर, डोंगरे सर, दाभाडे सर, भांडवलकर सर, काळे सर, घोडके सर, खरवडे सर, ठाकरे सर, सपाटे सर, हातमोडे सर, नितीन म्हेत्रे सर, कोरे सर, लहू पवार सर, शेवाळे सर, आडे सर, दहिफळे सर, तिबोले सर, बालासाहेब दहिफळे सर, चौधार सर, खेत्रे सर, प्रविण घोडके सर, काकडे सर, कोठेकर सर, धर्मराज करपे सर, पट्टे सर, कुलकर्णी सर, जे.एन. जाधव सर, बनसोडे सर, ठाकुर सर, ढाकणे सर, बावचे सर, आहेर सर, दिवेकर सर, ढोरमारे सर, गोरख पवार सर, ठवरे सर, हुलजुते सर, भरत काकडे सर, सचिन हुलजुते सर, क्षिरसागर सर, राऊत सर, केदार सर, कारंडे सर, तुरे सर, जोशी सर, मनकटवाड, घाडगे, तांबे सर, उमेश पंडित सर, सचिन पंडित सर, शिंदे सर यांच्यासह मोठ्या संख्येने शिक्षक बांधवांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक नंदकुमार पवार सर यांनी सूत्रसंचालन उमेश लगड सर व प्रशांत मस्के सर यांनी केले तर शेवटी सह शिक्षक चादर सर यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले. या शाळेच्या स्नेहसंमेलनासाठी बेलगुडवाडी ग्रामस्थांचे मोठे सहकार्य लाभले. हा कार्यक्रम घेण्यासाठी गावकऱ्यांनी लोकसहभागातून शाळेला स्टेज व साउंड सिस्टम साठी दहा हजार रुपये देत हातभार लावला होता. यानंतर कार्यक्रम सुरू झाल्यानंतर याठिकाणी उपस्थित मान्यवर व आपल्या गावातील या विद्यार्थ्यांची कला पाहून गावकऱ्यांनी भरभरून साथ देत या कार्यक्रमाच्या माध्यमातून जवळपास ६० हजार रुपयांचा निधी जमा करून दिला. तर या भरभरून प्रतिसादाबद्दल उपस्थित मान्यवरांनी जिल्हा परिषद शाळेचे सर्व शिक्षक, विद्यार्थी व ग्रामस्थांचे तोंडभरून कौतुक केले.

# नाशिकचा पालकमंत्री भाजपचाच सिंहस्थ कुंभमेळ्यामुळे वरिष्ठांचा निर्णय

## रायगडचा पालकमंत्री कोण? अद्यापही पेच कायम

**मुंबई (वृत्तसंस्था)**–सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर नाशिक जिल्ह्याचे पालकमंत्री पद हे भारतीय जनता पक्षाकडेच राहणार असून रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्री पदाचा तिढा अद्याप सुटलेला नसल्याची माहिती भारतीय जनता पक्षाच्या एका वरिष्ठ नेत्याने दिली आहे. त्यामुळे आता नाशिक जिल्ह्याचे पालकमंत्री पुन्हा एकदा गिरीश महाजन यांच्याकडेच देण्यात आले असून रायगडचा तिढा मात्र उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी एकत्र बसून सोडवण्याचा सल्ला देखील दिल्लीतून देण्यात आला आहे.



राज्यात सत्ता स्थापन झाल्यानंतर देखील अद्याप दोन जिल्ह्याचे पालकमंत्री पदाचा तिढा सुटलेला नाही. या दोन जागेवरून महायुतीमध्ये वाद असल्याचे पाहायला मिळत आहे. त्यामुळे नाशिक आणि रायगड जिल्ह्याला अजूनही पालकमंत्री मिळालेला नाही. १८ जानेवारी रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पालकमंत्री पदांच्या नावांची घोषणा केली होती. मात्र त्यानंतर दुसऱ्याच दिवशी नाशिक आणि रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्री पदाला स्थगिती द्यावी लागली होती. या दोन्ही जिल्ह्याच्या पालकमंत्री पदावरून एकनाथ शिंदे यांच्या गटाचे नेते नाराज असल्याची माहिती समोर आली आहे.नाशिक जिल्ह्यात आगामी काळात होणारा सिंहस्थ कुंभमेळा पाहता नाशिक जिल्ह्याचे पालकमंत्री पद हे भारतीय जनता पक्षाकडेच राहणार असल्याची माहिती दिल्लीतील सूत्रांनी दिली आहे. कुंभमेळा मंत्री म्हणून या आधीच गिरीश महाजन यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यामुळे आगामी काळात होणाऱ्या कुंभमेळ्याचे भव्य नियोजन करण्याचा निर्णय भारतीय जनता पक्षाने घेतला आहे. त्यासाठी गिरीश महाजन यांच्याकडेच पालकमंत्री पद राहणार असल्याची माहिती मिळाली आहे. आगामी एक ते दोन दिवसातच याबाबत अधिकृत घोषणा होऊ शकते.नाशिक जिल्ह्यातील सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर नाशिकचे पालकमंत्री पद हे भाजपकडे राहणार असले तरी रायगडच्या पालकमंत्री पदाबाबतचा तिढा अजूनही कायम आहे. यावर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी बसून एकत्र निर्णय घ्यावा, असे निर्देश दिल्लीतील भाजपच्या वरिष्ठ नेत्यांनी दिले आहेत. रायगड जिल्ह्याचे पालकमंत्री पद हे भरत गोगावले यांच्या कडे देण्याची एकनाथ शिंदे यांची इच्छा आहे. तर अजित पवार यांना आदिती तटकरे यांच्याकडे पालकमंत्री पद द्यायचे आहे. त्यामुळे आता याबाबत एकनाथ शिंदे आणि अजित पवार काय निर्णय घेतात? हे पहावे लागेल.

### मंत्री शिरसाटांची सिडको बसस्थानकाला अचानक भेट

# कामकाजाचा घेतला आढावा पाहणीनंतर कर्मचाऱ्यांना सुनावले

**छत्रपती संभाजीनगर (वृत्तसंस्था)**–छत्रपती संभाजीनगर येथील मध्यवर्ती बसस्थानकानंतर महत्त्वाचे असलेल्या सिडको बसस्थानकाला जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट यांनी आज अचानक भेट दिली. या भेटीदरम्यान त्यांनी बसस्थानक परिसरातील परिस्थितीची पाहणी करून आढावा घेतला. या पाहणीदरम्यान संजय शिरसाट चांगलेच संतापल्याचे दिसून आले. यावेळी त्यांनी सिडको बसस्थानक कर्मचाऱ्यांना आवश्यक त्या सूचना केल्या. पुणे शहरातील वर्दळ असणाऱ्या स्वारगेट बसस्थानक परिसरात २६ वर्षीय तरुणीवर शिवशाही बसमध्ये बलात्कार केल्याची घटना घडली होती. विशेष म्हणजे सुरक्षा रक्षकाच्या कॅबिनजवळ ही घटना घडल्याने एकच खळबळ उडाली होती. या घटनेनंतर पुण्यामध्ये महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. या घटनेच्या पार्श्वभूमीवर छत्रपती संभाजीनगरचे पालकमंत्री संजय शिरसाट यांनी शहरातील सिडको बसस्थानकाला गुरुवारी सकाळी अचानक भेट देऊन पाहणी केली.संजय शिरसाट यांनी सिडको बसस्थानकात अचानक भेट दिल्याने एसटी कर्मचाऱ्यांची तारांबळ उडाल्याचे दिसून आले.



पुण्यातील घटनेनंतर सिडको बसस्थानकातील कामकाजाचा तसेच सुरक्षेचा आढावा घेतला. यावेळी बसस्थानक परिसरातील असलेल्या अस्वच्छतेवरून देखील संजय शिरसाट यांनी कर्मचाऱ्यांना सुनावले. बसस्थानक परिसरातील सीसीटीव्ही तरी सुरू आहेत का? असा प्रश्न संजय शिरसाट यांनी उपस्थित केला आहे. याबाबत पोलिस आयुक्तांशी बोलणार असल्याचे ते म्हणाले. दुसरीकडे, पुणे स्टेशन एसटी बस स्थानकाची शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून पाहणी करण्यात आली. ठाकरे गटाचे नेते वसंत मोरे आणि पदाधिकाऱ्यांनी आगार कर्मचाऱ्यांशी चर्चा करून बसस्थानकातील सुविधांचा आढावा घेतला. यावेळी ठाकरे गटाकडून विविध मागण्यांचे निवेदन आगारप्रमुखांना देण्यात आले.दरम्यान, स्वारगेट बस डेपो परिसरात एसटी बस मध्ये झालेल्या बलात्कार प्रकरणानंतर आता महाराष्ट्र शासनाचा परिवहन विभाग हाय अलर्ट वर आला आहे. या संदर्भात आज झालेल्या बैठकीत सर्व एसटी डेपोंमध्ये सीसीटीव्हीचे जाळे बसवण्याच्या सूचना परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केल्या आहेत.

# भाजपला खिंडीत गाठण्याची रणनीती ठरली!

## थोरातांकडून 'हर हर महादेव'ची घोषणा

**संगमनेर । प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीनंतर विखुरलेली काँग्रेस नवीन प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या नेतृत्वात पुन्हा सावरू लागली आहे. राज्य पातळीवरील बैठक पार पडल्यानंतर आता जिल्हा पातळीवरही कार्यकर्त्यांच्या बैठका पार पडत आहेत. ज्येष्ठ नेते आढावा घेत आहेत. बुधवारी (२६ फेब्रुवारी) माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वात अहिल्यानगर जिल्ह्याची बैठक पार पडली. यावेळी त्यांनी विधान सभा निवडणुकीतील पराभव विसरून आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांवर लक्ष केंद्रीत करण्याबाबत मार्गदर्शन केले.

नवनिर्वाचित प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी नुकतीच जिल्हाध्यक्षांची बैठक मुंबईत घेतली. त्यानंतर ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांनी अहिल्यानगरमधील पदाधिकाऱ्यांची बैठक घेतली. यावेळी पदाधिकाऱ्यांसाठी खास जेवणाची सोय करण्यात आली होती. देशाती सर्वांना समानता अन् अधिकार देणारी लोकशाही वाचवण्यासाठी काँग्रेस पुन्हा मैदानात उतरल्याचे सांगून कार्यकर्त्यांमध्ये बळ भरण्यासाठी 'हर हर महादेव'ची घोषणा दिली. थोरातांची ही घोषणा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत काँग्रेससाठी 'टर्निंग पाईंट' ठरणार का? याची आता उत्सुकता आहे. बाळासाहेब थोरात म्हणाले, काँग्रेसचा विचार हा सर्वसामान्यांचा, सर्वधर्मसमभावचा विचार आहे. देशातील सर्वांना समानता व अधिकार देणारी लोकशाही वाचवायची आहे. यासाठी काँग्रेस पुन्हा मैदानात उतरली आहे. हार-जीत सुरू राहते पण आता 'हर हर महादेव', म्हणत प्रत्येकाने लोकशाही वाचवण्यासाठी पुढे यावे. काँग्रेसची विचारधारेवर यापूर्वीही अनेकदा प्रहार झाले आहेत. पण विचारांची, त्यागाची आणि बलिदानाची परंपरा फक्त काँग्रेसकडेच आहे.लोकसभा निवडणुकीतील विजयानतर फक्त चार महिन्यात विधानसभा निवडणुकीत एवढा कसा बदल होऊ शकतो, हा मोठा प्रश्नच आहे. ईव्हीएम'बाबत अनेकांना शंका आहे. निवडणूक आयोगाकडून अजून समाधानकारक उत्तर मिळालेले नाही. सत्ताधाऱ्यांनी टोकाचा धर्माचा प्रचार केला. सोशल मीडियाचा चुकीचा वापर करत त्यातून त्यांनी यश मिळवले. हे जरी सत्य असले, तरी आम्ही, काँग्रेस जनतेच्या प्रश्नावर पुन्हा मैदानात उतरलो आहोत', असे बाळासाहेब थोरात यांनी म्हटले.



# विशेष पोलीस महानिरीक्षक दत्तात्रय कराळे यांचा स्नेहबंधतर्फे गौरव

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

गुणवत्तापूर्ण सेवेसाठी राष्ट्रपती पदक मिळाल्याबद्दल नाशिकचे विशेष पोलीस महानिरीक्षक दत्तात्रय कराळे यांचा स्नेहबंध संस्थेच्या वतीने संस्थापक अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे यांनी गौरव केला.राष्ट्रपती पदक स्वीकारल्यानंतर कराळे हे नगर जिल्हा दौऱ्यावर आले होते. या निमित्ताने सन्मानपत्र व तुळशीचे रोप देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी पोलीस अधीक्षक राकेश ओला, अपर पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे उपस्थित होते.



डॉ. शिंदे म्हणाले, विशेष पोलीस महानिरीक्षक दत्तात्रय कराळे यांनी सांगली महापालिका शाळेतून प्राथमिक शिक्षण घेतले. सातारा सैनिक स्कूलमधून माध्यमिक शिक्षण पूर्ण करून रसायनशास्त्रात बीएस्सी पदवी मिळवली. चंद्रपूरमधील नक्षलग्रस्त भागात पोलीस उपअधीक्षक म्हणून त्यांनी कार्य केले. युनोमध्ये युगोस्लाव्हिया आणि कोसोवा येथे आंतरराष्ट्रीय पोलीस अधिकारी म्हणून त्यांनी सेवा दिली. मुंबई, नाशिक, कल्याण, ठाणे, धाराशिव येथे पोलीस उपायुक्त तसेच पोलीस अधीक्षक म्हणून जबाबदारी सांभाळली. लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, दहशतवाद विरोधी पथक, तसेच पोलीस महासंचालक कार्यालयात त्यांनी उल्लेखनीय सेवा दिली आहे. २०१३ मध्ये त्यांना राष्ट्रपती पदकाने गौरविण्यात आले होते. तसेच त्यांना युनो शांती सेवा पदक, आंतरराष्ट्रीय सेवा पदक, विशेष सेवा पदक आणि पोलीस महासंचालक सन्मान चिन्ह प्राप्त झाले आहे.कार्यक्रमाचे आयोजन स्नेहबंध संस्थेच्या वतीने करण्यात आले होते.

# ठाण्यात वनमंत्री गणेश नाईक यांच्या जनता दरबाराला उत्स्फूर्त प्रतिसाद!

**ठाणे । प्रतिनिधी**

ठाण्यात वनमंत्री गणेश नाईक यांच्या जनता दरबाराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून, मोठ्या संख्येने नागरिक आपल्या समस्या घेऊन उपस्थित होते. सोमवारी पार पडलेल्या या जनता दरबारात तब्बल ६५० पेक्षा अधिक लेखी निवेदने नागरिकांनी सादर केली. या दरम्यान, काही निवेदनांवर तात्काळ कार्यवाही करण्यात आली, तर उर्वरित अर्जांची सोडवणूक कालबद्ध पद्धतीने करण्याचे आदेश अधिकाऱ्यांना देण्यात आले.

गणेश नाईक यांनी ठाण्यात जनता दरबार घेणार असल्याची घोषणा केल्यानंतर महायुतीतील अंतर्गत घडामोडींना वेग आला होता. परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी देखील आपण पालघरमध्ये जनता दरबार घेऊ, असे जाहीर केले होते. मात्र, नाईक यांनी ठाण्यात जनता दरबार भरवून शिवसेना शिंदे गटाला जोरदार राजकीय संदेश दिला असल्याचे बोलले जात आहे. जनता दरबारात उपस्थित अधिकाऱ्यांना नाईक यांनी स्पष्ट निर्देश दिले की, जनतेच्या तक्रारी तत्काळ मार्गी लागाव्यात. काही अर्जांवर जनता दरबारातच अधिकाऱ्यांशी थेट संवाद साधून लगेच कार्यवाही करण्यात आली. उर्वरित निवेदनांचा पंधरा दिवसांत आढावा घेतला जाईल, असे नाईक यांनी जाहीर केले. याचा अर्थ ते ठाण्यात वारंवार जनता दरबार घेणार आहेत, हे स्पष्ट झाले आहे.या जनता दरबारात शासकीय, निमशासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था आणि विविध प्राधिकरणांचे वरिष्ठ अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच महायुतीचे विविध नेतेही या कार्यक्रमाला उपस्थित होते. त्यामध्ये –,भाजपा आमदार संजय केळकर,,माजी खासदार डॉ. संजीव नाईक,,आमदार निरंजन डावखरे,,भाजपा जिल्हाध्यक्ष संजय वाघुले,,प्रदेश पदाधिकारी संदीप लेले,,राष्ट्रवादी अजितदादा पवार गटाचे जिल्हाध्यक्ष आनंद परांजपे

गणेश नाईक यांनी जनता दरबार ही केवळ लोकसंवादाची संकल्पना नसून, तो जनतेला दिलेला शब्द पाळण्यासाठी आहे, असे स्पष्ट केले. महायुतीतील तिन्ही पक्ष मिळून नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी प्रयत्नशील असल्याचा पुनरुच्चार करत, यापुढेही ठाण्यात नियमित जनता दरबार घेतला जाईल, असे ते म्हणाले.गणेश नाईक यांनी घेतलेल्या या जनता दरबारामुळे जनतेला थेट आपल्या समस्यांसाठी एका व्यासपीठावर बोलण्याची संधी मिळाली. त्यांची तक्रार ऐकून घेऊन तातडीने कार्यवाही होत असल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले. या उपक्रमामुळे महायुतीतील अंतर्गत राजकारणालाही वेग आला असून, ठाण्यात आगामी राजकीय हालचालींवर सर्वांचे लक्ष लागले आहे.



# श्यामराव थोरात गुरुजी समतेचे सारथी-डॉ.सुखदेव थोरात

## केज येथे गौरव ग्रथ प्रकाशन सोहाळा थाटात संपन्न

**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील मौजे मांगवडगाव येथील रहिवाशी असणारे शामराव थोरात गुरुजी हे समाजासाठी एक आदर्श व्यक्तिमत्त्व होते. त्यांनी सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय क्षेत्रात महत्त्वपूर्ण कार्य केले. त्यांचे योगदान विशेषतः ग्रामीण शिक्षण, सामाजिक सुधारणा आणि वंचित घटकांच्या उन्नतीसाठी उल्लेखनीय राहिले आहे. याच बाबींवर प्रकाश टाकण्यासाठी कार्य गौरव ग्रंथ प्रकाशन सोहळ्याचे आयोजन दि.२ मार्च २०२४ रोजी जे.के फक्शन हॉल फुलेनगर केज येथे करण्यात आले होते. सदरील कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणुन विद्यापीठ अनुदान आयोगचे अध्यक्ष डॉ. सुखदेव थोरात तर प्रमुख पाहुणे म्हणुन जेष्ठ साहित्यिक योगिराज वाघमारे तसेच विचारवंत काळोखे हे होते . कार्यक्रमाच्या सुरुवातीला महापुरुषांच्या व कालकथित श्यामराव थोरात गुरुजी यांच्या प्रतिमांचे पुजन करण्यात आल्या नंतर अध्यक्ष तथा प्रमुख पाहुण्यांचा सत्कार स्वागत करण्यात आले. यावेळी






प्रतिकूल परिस्थितीवर मात करून जर्मनी येथे नौकरीस लागलेल्या कु. शिवानी बचुटे हिचा संयोजकाच्या वतीने सत्कार करण्यात आला. यानंतर श्यामराव थोरात गुरुजी यांच्या जीवन कार्यावर प्रकाशन टाकनारा कार्य गौरव ग्रंथ समतेचा शिलेदार या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक प्रा. वसंत ओगले यांनी केले .त्यानंतर गुरुजींच्या सोबत सर्व स्तरावर कार्य करणाऱ्यांनी आपले विचार व्यक्त करून कालकथित श्यामराव थोरात गुरुजी यांच्या आठवणी जिवंत केल्या मान्यवरांच्या मनोगतानंतर अध्यक्षीय समारोपात समतेचा शिलेदार श्यामराव थोरात गुरुजी अष्टपैलु व्यक्तिमत्व यावर डॉ. सुखदेव थोरात यांनी मनोगत व्यक्त केले . सदरील कार्यक्रमाचे बहारदार सुत्रसंचालन प्रज्ञा जाधव हिने केले तर आभार ड सचिन थोरात यांनी मानले . या कार्यक्रमाचे आयोजन गौरव ग्रंथ समितीचे अध्यक्ष डॉ. अशोक मुजमुले, सचिव डॉ .ओमप्रकाश नायर तसेच गौरव ग्रंथाचे मुख्य संपादक प्रा. प्रकाश सिरसाठ यांनी केले होते. कार्यक्रमास मोठ्या संख्येने जनसुमुदाय उपस्थित होता. सदरील कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मा. नगसेवक कपिल मस्के , दै. वादळ वार्ताचे संपादक अजय भांगे , नयुम शेख , विलास पवळे, निशांत जाधव, रोहित थोरात , राहुल शिंदे आदिनी परिश्रम घेतले.

# गंगापूर येथील वरखेड शिवारात शेतवस्तीवर दरोडा ,चौघांवर गंगापुर येथे उपचार सुरु

## मारहाण करुन रोख रकमेसह सोनेचांदी घेवुन फरार

**छ.संभाजीनगर । प्रा संजय तुपे**

गंगापूर वैजापूर रोडवरील वरखेड शिवारामध्ये पहाटे आज्ञात दरोडेखोरांनी शेतकरी कुटुंबांना मारहाण करुन गंभीर जखमी केले रोख रक्कम सोने-चांदी व टरबुजाच्या वाढीचे नुकसान करत फरार झाले. यामध्ये गंभीर जखमी झालेल्यांना गंगापूर जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. सुत्राकडुन मिळालेल्या माहीतीनुसार २ व ३ मार्चच्या मध्यरात्री अंदाजे तीन वाजे दरम्यान अज्ञात दरोडेखोरांनी गंगापुर वैजापुर रोडवरील नरहरी रांजनगाव फाट्या समोर वरखेड शिवारात चोदा मैल जवळ औटे यांच्या शेतवस्तीवर अज्ञात दरोडेखोरांनी दरोडा टाकुन शेतकरी अशोक भानुदास औटे वय (५५) मुलगा गणेश अशोक औटे वय ४०, सुन सोनाली गणेश औटे वय ३५ व नातु रुद्रा गणेश औटे वय १४ यांना गंभीर मारहाण करत जखमी केले व घरातील रोख रक्कम व सोन्याचे दागिने असा एकूण सव्वा



लाखाचा ऐवज चोरून नेला. जाताजाता त्यांच्या टरबुजाच्या वाडीचे अतोनात नुकसान केले. तसेच तुम्ही जर उठले तर तुम्हाला मारून टाकू असे धमकी देत व मोबाईल शेतात नेऊन फेकून दिले गंभीर जखमी झाल्याने औटे कुटुंब झोपूनच राहिले होते. सकाळी नातु रुद्र याने घराच्या बाजूला मोबाईल सापडून आणले त्यानंतर त्यांनी ११२ ला कॉल केला. परंतु पोलीस सकाळी दहा वाजेपर्यंत आले नाही यामुळे पोलिसा विषयी नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे शेजारी राहणाऱ्या नागरिकांनी या सर्व जखमींना गंगापूर येथे
चौघांवर गंगापुर येथे उपचार सुरु
रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले केले. १० वाजता शिल्लेगाव पोलीसस्टेशनचे पोलीस निरीक्षक सलीम चाऊस यांनी रुग्णालयात येऊन जखमींची भेट घेवुन विचारपुस केली. यामध्ये गणेश औटे हे गंभीर जखमी आहेत. पुढील प्रक्रिया पोलिस करत आहे.

# आत्महत्याग्रस्त शेतकरी बहिणींच्या सन्मानासाठी किसान पुत्रांनी पुढे यावे

## कालिदास आपेट यांचे आवाहन

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

आर्थिक विवंचनेतून आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या पत्नींचा १९ मार्च रोजी अन्नत्याग आंदोलन कार्यक्रमात साडीचोळी देवून सन्मान करण्यात येणार असून शेतकरी पुत्रांनी या सन्मान सोहळ्यात एका शेतकरी बहिणीचा सन्मान करण्यासाठी स्वतः हुन पुढे यावे व या पवित्र कार्यात आपला खारीचा वाटा उचलावा असे आवाहन शेतकरी संघटनेचे नेते कालिदास आपेट यांनी केले आहे.



या संदर्भात प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकात कालिदास आपेट यांनी म्हटले आहे की, आर्थिक विवंचनेतून आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या प्रति सहवेदना व्यक्त करण्यासाठी किसान पुत्र आंदोलनाच्या वतीने १९ मार्च हा दिवस शेतकरी सहवेदना दिवस म्हणून पाळला जातो. याच दिवशी आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या प्रति सहवेदना व्यक्त करण्यासाठी अन्नत्याग आंदोलन करुन विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येते. याच कार्यक्रमातील मुख्य सोहळ्यात अंबाजोगाई तालुक्यातील आत्महत्याग्रस्त शेतकरी बहिणींचा साडीचोळी देवून सन्मान करण्यात येणार आहे. या सन्मानाच्या खर्चाचा भार सर्व शेतकरी पुत्रांनी उचलावा अशी संकल्पना असून प्रत्येक एका शेतकरी पुत्रांने एका बहिणींचा साडीचोळी देवून सन्मान करावा अशी अपेक्षा आहे.

शेतकरी संघटनेतर्फे या सन्मान सोहळ्यासाठी पुढाकार घेतला असून शेतकरी पुत्रांकडून बहिणीच्या सन्मानासाठी इच्छुक असणाऱ्या शेतकरी पुत्रांना शोध घेण्यात येवून या सन्मानासाठी पुढे येणा-या शेतकरी पुत्राचे स्वागत करण्यात येत आहे. या कार्यक्रमात जास्तीत जास्त बहिणींचा सन्मान करण्याचे उद्दीष्ट असून शेतकरी पुत्राच्या आर्थिक योगदानातुनच हा उपक्रम यशस्वी होणार आहे. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी व विधवा बहिणींचा साडीचोळी देवून सन्मान करण्यासाठी शेतकरी पुत्रांनी मोठ्या संख्येने पुढे यावे व सर्व कार्यक्रमात सक्रिय सहभाग नोंदवावा असे आवाहन कालिदास आपेट यांनी केले आहे.

# डिजिटल मिडिया परिषदेचे राज्यस्तरीय पदाधिकारी निवडणार-प्रदेशाध्यक्ष वाघमारे

## मुख्य विश्वस्त श्री.एस.एम. देशमुख सर यांच्या अध्यक्षतेखाली लवकरच बैठक

**पुणे । प्रतिनिधी**

डिजिटल मिडिया परिषदेच्या राज्यस्तरीय पदाधिकाऱ्यांच्या निवडी संदर्भात लवकरच एक व्यापक बैठक घेतली जाणार असुन या बैठकीसाठी राज्यभरातील डिजिटल मिडिया परिषदेचे राज्य पदाधिकारी जिल्हा व तालुका पदाधिकारी आणि यु ट्यूब चॅनल व पोर्टल चे संपादक,पत्रकार यांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन डिजिटल मिडिया परिषदेचे प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे यांनी केले आहे.

याबाबत अधिक वृत्त असे की, मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त श्री.एस.एम.देशमुख सर यांच्या आदेशानुसार राज्यातील सर्व ३६ जिल्ह्यात डिजिटल मिडिया परिषदेचे जाळे निर्माण करण्याचं काम हाती घेण्यात आले आहे. राज्यातील जवळपास २० जिल्ह्यात जिल्हास्तरीय कार्यकारिणीच्या निवडी जाहीर केल्या गेल्या आहेत. उर्वरित जिल्ह्यांत सुध्दा या जिल्हा पदाधिकारी निवडी संदर्भात यंत्रणा उभी केली गेली आहे. येत्या काही दिवसांत एक व्यापक बैठक घेतली जाणार असुन या बैठकीची तारीख, वेळ आणि ठिकाण लवकरच कळवले जाईल. मराठी पत्रकार परिषदेची डिजिटल मिडिया परिषद ही विंग मुख्य विश्वस्त श्री.एस.एम.



देशमुख सर यांनी तयार केली असून आपण त्यांच्या आदेशानुसार महाराष्ट्रभर काम करत असल्याचे प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे यांनी सांगितले. या डिजिटल मिडिया परिषदेची राज्यस्तरीय पदाधिकारी निवड प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी काही दिवसांत एक राज्यस्तरीय बैठक बोलावली जाणार आहे. आपणही यात सहभागी होण्यासाठी तसेच राज्य पदासाठी व जिल्हा पदासाठी इच्छुक असल्यास ९८२२५४८६९६ या वाटस अप नंबर वर आपला जिल्हा, आपली थोडक्यात माहिती व आपल्या माध्यमाची अर्थात यु ट्यूब किंवा पोर्टल ची लिंक पाठवावी. येत्या काही दिवसांत मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त श्री.एस.एम.देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली व विश्वस्त किरण नाईक, विश्वस्त शरद पाबळे, राज्य अध्यक्ष मिलिंद अष्टीवकर, सरचिटणीस सुरेश नाईकवाडे आणि राज्यस्तरीय पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत ही महत्वपूर्ण बैठक घेऊन डिजिटल मिडिया परिषदेच्या राज्यस्तरीय पदाधिकाऱ्यांच्या व जिल्हा पदाधिकारी यांच्या निवडी जाहीर केल्या जाणार आहेत. तरी महाराष्ट्र राज्यातील सर्व जिल्ह्यातील यु ट्यूब चॅनल व पोर्टल चे संपादक आणि पत्रकार बांधवांनी या बैठकीसाठी उपस्थित रहावे असे आवाहनही प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे यांनी केले आहे.

# भडकेल येथील उपसरपंच रुक्मिणी सारगुडे यांच्यावरील अविश्वास ठराव बारगळला

**पिंपळवंडी । प्रतिनिधी**

अंमळनेर पासून जवळ असलेल्या व शिरूर (कासार) तालुक्यातील भडकेल येथील विद्यमान उपसरपंच रुक्मिणी शंकर सारगुडे यांच्यावर ग्रामपंचायत सदस्यांनी आणलेला अविश्वास दर्शक ठराव अविश्वास ठरावाच्या बाजूने बहुमत नसल्याने बारगळला व भडकेलच्या उपसरपंचपदी रुक्मिणी सारगुडे याच पुन्हा विराजमान राहिल्या आहेत.याविषयी सविस्तर माहिती अशी



की,अंमळनेर पासून जवळ असलेल्या भडकेल ग्रामपंचायत मध्ये सरपंच व्यतिरिक्त ७ सदस्य आहेत.अविश्वास ठराव मंजूर होण्यासाठी सदस्यापैकी ३/४ चतुर्थांश बहुमताची आवश्यकता असते.हा विश्वास ठराव मंजूर होण्यास ६ सदस्य उपस्थित असावे लागतात.यावेळी सरपंचासह केवळ चारच सदस्य उपस्थित राहिल्याने अविश्वास ठराव नामंजूर करण्यात येऊन फेटाळण्यात आला.यावेळी उपस्थितामध्ये सरपंच सुनंदा पंजाब आहेर,सदस्य- शिवाजी चंद्रभान नरवडे,विष्णू किसन आहेर,रुक्मिणी शंकर सारगुडे तसेच गैरहजर सदस्यांमध्ये द्वारकाबाई महादेव साबळे,संजीवनी सोना आहेर,भिमाबाई मच्छिंद्र आहेर,संगीता पोपट पुलावळे यांचा समावेश होता. उपसरपंच या ग्रामपंचायत सदस्यांना विश्वासात न घेता चुकीच्या पद्धतीने व बेकायदेशीर पद्धतीने काम करतात, शासनाच्या विविध योजनांची लोकांना चुकीची माहिती देत व पदाचा दुरुपयोग करतात,त्यामुळे गावच्या विकास कामात बाधा येत असून लोकांना शासनाच्या योजनेचा लाभ घेता येत नाही,असा त्यांच्यावर विरोधकांनी आरोप करून अविश्वास ठराव आणला होता.या विषयावर ग्रामपंचायत कार्यालय भडकेल येथे दि.३ मार्च २०२५ सोमवार रोजी शिरूर तहसील कार्यालयाचे तहसीलदार सुरेश घोळवे व ग्रामविकास अधिकारी एस.एम.पुरी यांच्या उपस्थितीत दुपारी १२:०० वाजता बैठक झाली.व सविस्तर चर्चा होऊन अविश्वास ठराव फेटाळण्यात आला.सदरील भडकेल ग्रामपंचायतवर आ.सुरेश आण्णा धस यांचे वर्चस्व राहीलेले आहे.

# माजी नगरसेवक फारुख भाई कुरेशी यांची जालना जिल्हा उपाध्यक्षपदी निवड

**जालना । असलम कुरेशी**

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री नामदार अजित दादा पवार यांचे अत्यंत विश्वासू राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष माजी आमदार अरविंद अण्णा चव्हाण यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून जाफराबाद शहराचे माजी नगरसेवक फारुख भाई कुरेशी यांची राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गटाच्या जालना जिल्हा उपाध्यक्ष पदी, ड. विनोद डींगे यांची जाफराबाद न्यायालय वकील संघाच्या तालुकाध्यक्षपदी,



माजी नगरसेवक तथा उद्योजक बाळूभाऊ हिवाळे यांची जाफराबाद तालुका उपाध्यक्षपदी तसेच ड. सचिन साहेबराव चोरमारे यांची राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी पक्ष प्रवेशासह जाफराबाद कार्याध्यक्ष पदी निवड करण्यात आली. सर्व पदाधिकाऱ्यांचे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गटाचे जिल्हा अध्यक्ष माजी आमदार अरविंद चव्हाण यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077